मार्ग जर
अडचणींचा
वाटत असेल
तर, साध्य
केलेल ध्येय हे
त्याहून आधिक
सुंदर असेल.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार ०५ जुले २०२५ | अंक १९७० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# मुंबईत आज विजय मेळावा; राज ठाकरे, उद्धव ठाकरे एकाच मंचावर, ठाकरे बंधूंच्या भूमिकेकडे राज्याचं लक्ष

**हा मेळावा वरळी डोम येथे होणार असून जय्यत तयारी करण्यात करण्यात आली आहे.**

राज्यात हिंदीच्या मुद्द्यावरून वातावरण चांगलंच तापलं होतं. पहिलीपासून हिंदीची सक्ती नको अशी भूमिका अनेक पक्षांनी आणि संघटनांनी घेतली होती. मनसेनं हिंदी सक्तीच्या मुद्यावर मोठं आंदोलन केलं, त्यानंतर या आंदोलनात शिवसेना ठाकरे गटानं देखील उडी घेतली. पाच जुलै म्हणजे आज याविरोधात भव्य असा मोर्चा निघणार होता, या मोर्चात शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे दोन्ही ठाकरे बंधू सहभागी होणार होते. मात्र सराकारने त्रिभाषा सूत्राबाबतचे दोन्ही अध्यादेश रद्द केले, त्यामुळे हा मोर्चा देखील मागे घेण्यात आला. मात्र त्यानंतर आज आता मुंबईमध्ये विजयी मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे. वरळी डोम येथे हा मेळावा पार पडणार आहे. या मेळाव्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. या मेळाव्याला उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे दोन्ही ठाकरे बंधू उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यात ठाकरे बंधू काय बोलणार? याकडे



आता अवघ्या राज्याचं लक्ष लागलं आहे. सरकारने त्रिभाषा सूत्राचा अध्यादेश वापस घेतल्यानंतर आता या मेळाव्याचं आयोजन करण्यात येत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे एकत्र येणार असल्याची चर्चा सुरू आहे, या पार्श्वभूमीवर देखील या मेळाव्याला विशेष महत्त्व आहे. या मेळाव्यात राज ठाकरे काय बोलणार? उद्धव ठाकरे काय भूमिका मांडणार? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. त्रिभाषा सूत्राचा निर्णय मागे दरम्यान काही दिवसांपूर्वीच सरकारने त्रिभाषा सूत्राचा निर्णय मागे घेतला आहे. त्यानंतर आता नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीचा अहवाल आल्यानंतरच आता याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे. दरम्यान सरकारने हा निर्णय घेतल्यानंतर आता आज मुंबईत विजयी मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे. या मेळाव्यासाठी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे दोन्ही ठाकरे बंधू उपस्थिती राहणार आहेत. हा मेळावा वरळी डोम येथे होणार असून जय्यत तयारी करण्यात आली आहे.

## विवेकवर्धिनी शाळेच्या डीपी भोवती झाडांचा विळखा काढला

शहरातील शारदा नगर परिसरातील विवेकवर्धिनी शाळेजवळील महावितरणच्या डीपीभोवती झाडे, वेली व झुडपांनी घातलेला विळखा विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला गंभीर धोका ठरत होता. सुरू असलेल्या पावसाळ्यात वाऱ्यामुळे विद्युत तारांमध्ये शॉर्टसर्किट होण्याची शक्यता वाढली होती. या परिसरात दररोज शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत असल्याने विद्यार्थ्यांच्या जीवाशी थेट संबंध असलेला प्रश्न निर्माण झाला होता. ही गंभीर बाब हेरून सामाजिक कार्यकर्ते ॲड.मनोज संकाये यांनी तात्काळ पुढाकार घेत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य द्या, अन्यथा अपघाताची जबाबदारी महावितरणवर राहील अशी ठाम भूमिका घेत महावितरणकडे तातडीने कारवाईची मागणी केली होती. संकाये यांनी स्पष्ट केले की, शाळेच्या डीपीभोवती वाढलेली झाडं व वेली विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळण्यासारखी परिस्थिती निर्माण करत आहेत. त्यामुळे महावितरणने झपाट्याने उपाययोजना करणे गरजेचे आहे. या मागणीची दखल महावितरण विभागाने लगेच घेतली असून, बातमी प्रसिद्ध होताच अवघ्या एका दिवसात डीपीवरील सर्व झाडं, वेली व झुडपे हटविण्यात आले. परिणामी, परिसर पुन्हा सुरक्षित झाला असून संभाव्य धोका टळला आहे. या जलद कारवाईमुळे शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, पालक तसेच परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, सामाजिक कार्यकर्ते ॲड.



मनोज संकाये यांच्या जागरूकतेला आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण बाब ठरलेल्या या प्रकरणात लोकप्रतिनिधींनी आणि शासकीय यंत्रणांनी तत्परतेने प्रतिसाद दिल्यास समाजात जनतेचा विश्वास अधिक बळकट होतो, हे या घटनेतून सिद्ध झाले आहे.

## समाजसेवक विजयकुमार गोल्हार यांना साक्षात गरुडदेवांचे दर्शन



**आष्टी (प्रतिनिधी) गरुड दिसणे हे शुभ असू शकते, परंतु सामान्यत: ते सकारात्मक बदलांचे आणि यशाचे लक्षण मानले जाते. जर तुम्हाला अचानक एखादा गरुड दिसला किंवा त्याचे चित्र दिसले, तर ते तुमच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडणार असल्याचे संकेत असू शकतात, जसे की रखडलेली कामे पूर्ण होणे, असे एका ज्योतिषीय वेबसाइटने नमूद केले आहे. गरुड हे शक्ती, धैर्य आणि यशाचे प्रतीक आहे. त्यामुळे, गरुड दिसणे म्हणजे तुम्ही करत असलेल्या कामात तुम्हाला यश मिळेल असा विश्वास ठेवला जातो, असे अनेक ज्योतिष तज्ज्ञांचे मत आहे. गरुडाला आकाशात उंच उडताना पाहणे म्हणजे उच्च दृष्टिकोन ठेवणे, आपल्या**

## आजपासून आषाढी एकादशीनिमित्त बीडमध्ये नवनाथ कथा व कीर्तन सोहळा



आषाढी एकादशीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्र ासह देशभरात भक्तीमय वातावरण पाहायला मिळते. पंढरपूर गाठता न आलेल्या भाविक भक्तांसाठी बीड शहरात भक्तिरसाचा आनंद घेता यावा या हेतूने स्वर्गीय झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने दिनांक ४ जुलै ते ७ जुलै २०२५ या कालावधीत नवनाथ कथा व सांप्रदायिक कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हे चार दिवसीय भक्तिमय आयोजन खटोड प्लाझा, वृंदावन गार्डनच्या पुढे एमआयडीसी रोड, बीड येथे होणार आहे. दररोज सकाळी ११ ते सायंकाळी ९ या वेळेत नवनाथ कथा होणार असून, कथा समाप्तीनंतर कीर्तन सत्र पार पडणार आहे.

## मराठा सेवा संघ बीड जिल्हा व ३३ कक्षाची पुनर्गठन बैठक शनिवारी

बीड ,: केंद्रीय कार्यकारिणीने सूचना केल्याप्रमाणे मराठा सेवा संघ व ३३ कक्षांच्या पुनर्बाधणीसाठी मराठा सेवा संघ केंद्रीय कार्यकारिणीने नियुक्त केलेल्या समितीची बैठक ०५ जुलै २०२५ शनिवार रोजी आयोजित करण्यात आली आहे. सायंकाळी ४:३० वाजता, शासकीय विश्राम गृह बीड येथे , मराठवाडा निवड समिती प्रमुख शिवश्री संदीपान जाधव यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार आहे अशी माहिती माहिती मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय शेंडगे यांनी दिली आहे..मराठा सेवा संघ या सामाजिक संघटनेची स्थापना १ सप्टेंबर १९९० रोजी पुरुषोत्तम खेडेकर यांनी अकोला येथे केली. गेल्या ३४ वर्षापासून मराठा सेवा संघ संपूर्ण देश- विदेशात ३३ कक्षांच्या माध्यमातून विविध समाजाभिमुख उपक्रम राबवून सामाजिक कार्य करीत आहे. मराठा सेवा संघ ही नोंदणीकृत सेवाभावी संस्था आहे. मराठा समाजातील सर्वच जाती, पोटजाती, जात घटकातील, शासकीय, निमशासकीय, खाजगी क्षेत्रातील सर्वस्तरीय नोकरदार व सेवानिवृत्त तसेच उद्योजक, व्यावसायिक यांनी समाजासाठी विकासात्मक स्वरूपाच्या सेवा उपलब्ध करून देणे हे या चळवळीचे मुख्य उद्दिष्ट आहे. मराठा सेवा संघाचे कार्य समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी केंद्रीय कार्यकारिणीने सूचना केल्याप्रमाणे मराठा सेवा संघ व इतर कक्षांच्या पुनर्बाधणीसाठी मराठा सेवा संघ केंद्रीय कार्यकारिणीने नियुक्त केलेल्या निवड समितीची बैठक ५ जुलै रोजी होत आहे.मराठा सेवा संघ व ३३ कक्षांमधील तालुका कार्यकारिणी जिल्हा कार्यकारिणी, विभाग कार्यकारिणी तसेच राज्य कार्यकारिणीवर कार्य करू इच्छिणाऱ्या इच्छुकांनी आपले अर्ज समितीकडे बैठकीत सादर करावेत.सदरील समितीच्या बैठकीस निवड समिती प्रमुख संदीपान जाधव यांच्या समवेत निवड समितीचे सदस्य अशोक ठाकरे,धनंजय पाटील, पंजाबराव चव्हाण, लिंबराज सूर्यवंशी,काळबांडे सर वर्षाताई माने, मोरजकर ताई, ज्योतीताई जाधव इत्यादी मान्यवर हजर राहणार आहेत.तरी मराठा सेवा संघ व ३३ कक्षांच्या आजीवन सदस्य, आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते व समाज बांधव यांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन मराठा सेवा संघ विभागीय अध्यक्ष अशोक ठाकरे, जिल्हाध्यक्ष धनंजय शेंडगे (प), नागनाथ जाधव (पूर्व) कार्याध्यक्ष ज.रा.शिंदे , सचिव प्रा.पंजाबराव येडे यांनी केले आहे.******

## बीडमध्ये आषाढी एकादशीनिमित्त अभंगवाणी भक्तिसंगीत कार्यक्रम



बीड (प्रतिनिधी)दि.४ : अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, बीड शाखा, बालरंगभूमी परिषद आणि सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (काकू) महाविद्यालयातील संगीत विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशीनिमित्त ङ्गअभंगवाणीफ हा भक्तिसंगीत गायन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती नाट्य परिषदेच्या अध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर यांनी दिली. हा कार्यक्रम आज (दि.५) सकाळी ११ वाजता सौ. के. एस. के. महाविद्यालयाच्या सभागृहात होणार आहे. यात बीड शहर आणि परिसरातील बालकलावंत गायक तसेच नामवंत गायक अभंग गायन सादर करणार असून जवळपास ३० कलावंत या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाचा लाभ बीडकर रसिक श्रोत्यांनी घ्यावा, असे आवाहन नाट्य परिषद अध्यक्ष प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर, स्नेहल पाठक, डॉ. शिवानंद क्षीरसागर, डॉ. संजय पाटील देवळाणकर, भरत लोळगे, अनुराधा चिंचोलकर, मिलिंद शिवणीकर, विलास सोनवणे, राहुल सोनवणे, दुष्यंत रामटेके, दीपक जमधाडे, अमित गाडे, अनिता शिंदे, नामदेव साळुंके, सुरेश साळुंके, सुरेश थोरात, विजय राख तसेच नाट्य परिषद व बालरंगभूमी परिषदेचे सदस्यांनी केले आहे.

## जुनी पेन्शन व शंभर टक्के अनुदान यासाठी १० जुलै रोजी संपूर्ण मराठवाड्यात होणार धरणे आंदोलन

परभणी: सर्वांनाच जुनी पेन्शन लागू करावी व राज्यातील निकषपात्र विनाअनुदानित शाळा, वर्ग आणि तुकड्यांना प्रचलित अनुदान सुत्रानुसार अनुदान द्यावे, राज्यातील खाजगी इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवासंरक्षण व यथानियम वेतन देण्यात यावे या व इतर मागण्यांच्या पुर्ततेसाठी मराठवाडा विभागातील सर्व शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर १० जुलै रोजी मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव आणि सरचिटणीस राजकुमार कदम यांनी मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्री यांना पाठविण्यात आले आहे. या बाबत मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, कोणत्याही देशाची प्रगती त्या देशातील शिक्षण आणि शिक्षक व शिक्षणाशी संबधीत घटकांची स्थिती यावर अवलंबून असते. ज्या देशांनी शिक्षणास सर्वोच्च प्रधान्य दिले ते देश जगात महासत्ता म्हणून मानाने मिरवत आहेत. स्वातंत्र्योत्तर भारतीय राज्यकर्त्यांनी शिक्षणास तेवढे महत्व दिले नाही. महान शैक्षणिक परंपरा असलेले महाराष्ट्र राज्य देखील त्यास अपवाद नाही. राज्य सरकारच्या धरसोडीच्या व नकारात्मक शैक्षणिक धोरणांमुळे राज्यातील शालेय शिक्षण विभाग प्रश्नग्रस्त बनला आहे. राज्यकर्त्यांनी स्वत:साठी आकर्षक पेन्शन योजना लागू करून घेतलेली असताना शिक्षक शिक्षकेत्तरांना अतिशय कुचकामी अशी अंशदायी पेन्शनयोजना लागू केली आहे. गेल्या पाव शतकांपासून राज्यातील हजारो शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी विनावेतन किंवा अल्प वेतनावर काम करित आहेत. ही खेदाची बाब आहे. शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व शिक्षणाशी संबंधीत इतर घटकांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. त्यामुळे या सर्व घटकांमध्ये प्रचंड असंतोष आहे. तो व्यक्त करण्यासाठी आणि खालील मागण्यांच्या पुर्ततेसाठी दि. १०/ ०७/२०२५ रोजी गुरुवारी सायं. ०४ ते ०६ या वेळेत मराठवाडा विभागातील सर्व शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने लक्षवेधी धरणे आंदोलन आयोजित केले आहे. या आंदोलना मागच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे १) अंशदायी पेन्शन योजना रद्द करून सर्वांनाच जुनी पेन्शन योजना लागू करावी. ०१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त परंतु नंतर १००% अनुदानावर आलेल्या शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना इतर राज्य सरकारी कर्मचाऱ्या प्रमाणे जुनी पेन्शन योजना लागू करण्याची कार्यवाही ताबडतोब करावी. वरिल मागण्यांच्या पुर्ततेसाठी १० जुलै रोजी आयोजित आंदोलनाची उचित नोंद घेऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावेत व अप्रिय घटना टाळाव्यात ही विनंती मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने संघटनेचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव आणि सरचिटणीस राजकुमार कदम परभणी जिल्हाध्यक्ष यशवंत मकरंद,सचिव निशांत हाके,महिला आघाडी अध्यक्ष दुर्गा देशमुख यांच्यासह विक्रम कदम,बी.टी.सांगळे,संतोष साखरे,अमित मोगल,दादाराव गिराम सेलु तालुकाध्यक्ष संतोष मळसटवाड,विजय धापसे पुर्णा तालुकाध्यक्ष रमेश सुर्यवंशी,शिवसांब महाजन यांनी केली आहे.

## संपादकीय

# स्वामी विवेकानंद जगाच्या पाठीवरील तेजस्वी युगपुरुष

स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कोलकाता येथे झाला.स्वामी विवेकानंद यांची आवड आणि अभ्यास प्रगल्भ होता.त्यांना संगीत, साहित्य आणि तत्वज्ञान यात विशेष रस होता.याव्यतीरीक्त पोहणे, घोडेस्वारी व कुस्ती हे त्यांचे आवडते छंद होते. वयाच्या २५ व्या वर्षी स्वामीजींनी वेद, पुराण, बायबल, कुराण, धम्मपद, तनाख, गुरू ग्रंथ साहिब, दास कॅपिटल, भांडवलशाही, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र या सर्वच विचारधारा अवगत केलेल्या होत्या.म्हणजे त्यांना इतर सर्व ज्ञान तर होतेच परंतु जगातील संपूर्ण धर्माचा अभ्यास त्यांनी अवगत केलेला होता.यावरून असे वाटते की स्वामी विवेकानंदांना संपूर्ण ब्रम्हांडाचे ज्ञान असल्याचे दिसून येते. याला दैवी शक्तीच म्हणावे लागेल.कालांतराने रामकृष्ण परमहंस यांच्या आश्रयाला गेले व रामकृष्ण परमहंस यांच्या रहस्यमय व्यक्तीतत्वाने ते अत्यंत प्रभावीत झाले आणि त्यांचे संपूर्ण जीवन बदलले. स्वामींनी १८८१ मध्ये रामकृष्ण परमहंस यांना आपले गुरू केले.१८८६ मध्ये रामकृष्ण परमहंस यांच्या मृत्यूनंतर स्वामी विवेकानंदांच्या कार्याला एक नवीन वळण आले.वयाच्या २५ व्या वर्षी त्यांनी भगवे वस्त्र धारण केले व संपूर्ण भारतभर पायी प्रवास सुरू केला. देशातील गरीबी आणि सामाजिक दुष्टांची अवस्था पाहून त्यांची मनस्थिती दु:खावली गेली.काही दिवसांतच शिकागो येथे जगातील धर्म परिषद होणार असल्याची माहिती मिळाली.११ सप्टेंबर १८९३ ला शिकागो येथे जगातील धर्म परिषद भरली.भारताचे प्रतिनिधी म्हणून स्वामी विवेकानंद तेथे पोहोचले.तिथे अनेकांनी खूप प्रयत्न केले की स्वामी विवेकानंद यांना बोलायला वेळ मिळुन नये.परंतु एका अमेरिकन प्राध्यापकाच्या प्रयत्नाने त्यांना बोलायला थोडा वेळ मिळाला. त्यानी जागतिक धर्म परिषदेतील धर्म संसदेतील भाषणाची सुरुवात बंधु व भगिनीअसे करून केली. यानंतर त्यांच्या भाषणाचे विचार ऐकून संपूर्ण धर्म परिषद स्तब्ध झाली व टाळ्यांचा कडकडाट झाला जनुकाय आकाशवाणी झाली की काय! आणि स्वामी विवेकानंद जगप्रसिद्ध झाले व त्यांचे अमेरिकेत जोरदार स्वागत झाले. युगानुयुगे आपल्या तेजस्वी विचारांची ज्योत संपूर्ण जगात सकारात्मक व शांती प्रदान करणारी रहावी या उद्देशाने स्वामी विवेकानंद यांनी आपले कार्य पुढे सुरूच ठेवले. एकतेचा संदेश जगाला देऊन सर्व मानवजातीला बंधुतेचा, मानवतेचा संदेश देणारे व सुखशांती निर्माण करणारे कार्य स्वामी विवेकानंद यांनी केले. त्यांनी जगाचा इतिहास आणि पाश्चात तत्वज्ञानांचा अभ्यास महाविद्यालयीन जीवनातच केला. अनेक धर्माच्या तात्विक अभ्यासामुळे त्यांनी अमेरिकेतील शिकागो येथे भरलेल्या सर्वधर्म परिषदेत हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व त्यांनी केले. ११ सप्टेंबर १८९३ या दिवशीच्या त्यांच्या भाषणाने संपूर्ण सभा प्रभावित झाली व १७ दिवसाच्या या परिषदेत हिंदुस्थानातील प्रभाव दिसून आला.मुलांचा सर्वांगीण विकास व त्यांच्या कौशल्यांचा विकास व्हावा, मुले आत्मनिर्भर व्हावी असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यांच्या या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता आजच्या युवा पिढींनी अवगत करायला हवी. मूलांचा शारीरिक, मानसिक आणि अध्यात्मिक विकास होऊन मन, बुद्धी विकसित करणारे, स्वावलंबी, चारित्र्यसंपन्न ओळख निर्माण करणारे शिक्षण असावे असे त्यांचे मत होते. भारताच्या आध्यात्मिक संस्कृतीबद्दल गाड अभिमान असला, तरी त्यात शिरलेल्या अनिष्ट रुढी, परंपरा, जातीभेद यांसारख्या हीन गोष्टींवर त्यांनी भाषणांतून कडाडून हल्ला चढवला. निराकार समाधीत मन रहाण्याची स्वत:ची स्वाभाविक प्रवृत्ती बाजूला सारून त्यांनी सर्वसामान्य लोकांच्या सुखदु:खाचा योग्य पातळीवरही विचार केला आणि त्यांच्यासाठी झटले व सर्वस्वाचे समर्पण म्हणजेच खरा संन्यासफ हे वचन सार्थ केले. स्वामी विवेकानंद हे सर्व तरुणांचे आजही प्रेरणास्थान आहेत. अशा या महान तत्त्वज्ञानी महापुरुषाला माझा सलाम.आज देशात आपल्याला जी काही एकता आणि बंधुता दिसून येत आहे त्याचे संपूर्ण श्रेय स्वामी विवेकानंदांना जाते.१८९९ साली स्वामीजींनी पुन्हा पश्चिमेकडे प्रवेश केला आणि भारतीय संस्कृतीचा, अध्यात्माचा संदेश प्रसारित केला.

**रमेश लांजेवार स्वतंत्र पत्रकार**

# खा.बजरंग सोनवणेंच्या वाढदिवसानिमीत्त जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची होणार आरोग्य तपासणी

## राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, जिल्हा शल्यचिकित्सक यांचे वैद्यकिय अधिक्षकांना पत्र

बीड: बीडचे खा.बजरंग सोनवणे यांचा वाढदिवस दि.६ जुलै रोजी जिल्हाभरात विविध कार्यक्रमांनी साजरा केला जात आहे. तालुकास्तरावर राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने रक्तदान शिबीरांचे आयोजन केले आहे. दरम्यान, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत अंगणवाडी ते बारावीपर्यंत विद्यार्थ्यांची म ोफत आरोग्य तपासणी केली जाणार आहे.

खा.बजरंग सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्याबाबत डॉ.संजय राऊत, जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा रूग्णालय बीड यांनी सर्व वैद्यकिय अधिक्षकांना याबाबत पत्र दिले आहे.



राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत ० ते १८ वर्षे वयोगटातील बालकांची आरोग्य तपासणी करयात येते. यामध्ये ० ते ६ वर्षे वयोगटातील अंगणवाडीमध्ये जाणाऱ्या बालकांची वर्षातून २ वेळा तर शासकीय आणि निमशासकीय शाळांमधील ६ ते १८ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांची वर्षातून एकदा आरोग्य तपासणी करण्यात येते. दरम्यान, दि.६ जुलै रोजी खा.बजरंग सोनवणे यांच्या वाढदिवसानिमीत्त संपूर्ण बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुका स्तरावर विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीने वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे. त्यासाठी शिक्षण विभागाशी संपर्क करण्यात येत असून संबंधीत शाळेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याबाबत जनजागृती करावी, असेही डॉ.संजय राऊत, जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय, यांनी म्हटले आहे. दरम्यान, यासाठी तालुकास्तरावर नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. वैद्यकिय अधिक्षक, सर्व जिल्हा/ उप जिल्हा/ ग्रामिण रुग्णालय, यांना पत्र पाठवून आपल्या अधिनस्त आरबीएसके अंतर्गत सर्व वैद्यकिय पथकांना सज्ज ठेवून आरोग्य तपासणी करावी, असे आदेश दिले आहेत.

### या कार्यक्रमांचाही समावेश

केज शहर: उपजिल्हा रुग्णालय, केज येथे रुग्णांना साडी वाटप, फळ वाटप, बालाजी मंदिर येथे आरती, दर्गा येथे चादर अर्पण करणे,

वयोवृद्ध आश्रम येथे किट वाटप, शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण, शेतकरी म हिलांचा सन्मान असे विविध कार्यक्रम.

रक्तदान शिबीर: येडेश्वरी कारखाना आनंदगाव सा, आष्टी, पाटोदा, अंबाजोगाई, घाटनांदूर, धारूर, वाघोली,सिरसाळा. इतर सामाजिक उपक्रम: बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागात शालेय साहित्य वाटप, फळ वाटप, वृक्षारोपण, फराळीचा कार्यक्रम होणार आहे.

----ooooo-----

# शांताई अर्बन चा चतुर्थ वर्धापन दिन उत्साहात साजरा

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला

बीड (प्रतिनिधी) - शांताई अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीचा चतुर्थ वर्धापन दिन ४ जुलै रोजी उत्साहात व दिमाखात साजरा करण्यात आला. या वेळी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास प्रम ुख पाहुणे म्हणून मा. श्री. विजयराज बंब ,मा. डॉ. प्रफुल्ल सुस्कर, ,मा. श्री. श्याम अरुण डाके सर यांची उपस्थिती लाभली. दीप प्रज्वलन झाल्यानंतर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. विद्यार्थ्यांना प्रम ाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. पालक व शिक्षकांनी संस्थेच्या या उपक्रमाचे कौतुक केले.तसेच संस्थेच्या पायाभरणीत मुख्य वाटा असलेल्या पिग्मी एजंटचा देखील सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस संस्थेचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर शिंदे यांनी प्रस्तावना सादर करत पाहुण्यांचे स्वागत केले. त्यांनी संस्थेच्या चार वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला व सभासद, संचालक, कर्मचारी आणि हितचिंतकांचे आभार मानले. प्रमुख पाहुणे विजयराज बंब आपल्या भाषणातून शांताई अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या पारदर्शक व समाजाभिमुख कामकाजाचे कौतुक



केले. ङ्गही संस्था केवळ आर्थिक सेवा पुरवणारी न राहता समाजाला दिशा देणारी प्रेरणास्थान बनत आहे,ङ्ख असे गौरवोद्गार व्यक्त करण्यात आले. डॉ.सुस्कर यांनी संस्थेचे अध्यक्ष डॉ.ज्ञानेश्वर शिंदे सर यांच्या संस्थेची वाटचाल त्यांच्या कार्याचे कौतुक केले व त्यांना पुढील विकास कामासाठी शुभेच्छा दिल्या. श्याम डाके सर यांनी शांताई अर्बनच्या विविध उपक्रमाचे कौतुक करून पारदर्शक व्यवहार करणाऱ्या संस्थेस पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या कार्यक्रम ाचे आभार प्रा.पी.जी.पोळ यांनी केले कार्यक्रमाचे सूत्र संचालन शिरापूरकर ताई नी केलें कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे उपाध्यक्ष संदीपजी वाघमारे सर राजेश काळे, व ,परमेश्वर शिंदे, राहुल बोराडे तसेच संचालक मंडळ नितीन जाधव,कैलास लांडे,साईनाथ वाघमारे व कर्मचारी सभासद ठेविदार हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांचे आरोग्य व सुरक्षे विषयी शिक्षण विभागाने घालून दिलेल्या निर्देशांचे पालन होते का ?

## याबाबत सर्व शाळांची शिक्षण विभागा मार्फत चौकशी करण्यात यावी - सेवकराम जाधव

परळी वैजनाथ : बीड येथे ट्युशन क्लासेस मध्ये विद्यार्थिनी सोबत घडलेल्या विकृत घटणेमुळे संबंध महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्रास मोठा धक्का बसला असून त्याकारणाने पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. निश्चितच विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे भवितव्य म्हणत असताना तेच जर सुरक्षीत नसतील तर देशाचे भविष्य धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही. तथापि विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सुरक्षेच्या बाबतीत शाळा आणि शिकवणी क्लासेसच्या ठिकाणी येणारे संभाव्य धोके टाळण्याकरीता सामाजिक कार्यकर्ते सेवकराम जाधव व पत्रकार केशव मुंडे यांच्या वतीने परळी येथील गटशिक्षणाधिकारी श्री एस.एम. कनाके यांना निवेदन देण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने परळी तालुक्यातील शिक्षण विभागाच्या कार्यक्षेत्राअंतर्गत येणाऱ्या सर्व सरकारी व खाजगी शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करता प्रत्येक शाळेत पिण्याचे शुद्ध पाणी व शौचालय (वॉश रूम) आहे का ? त्याच बरोबर सुरक्षेचा विचार करता प्राथमिक उपचार पेटी, सीसीटीव्ही कॅमेरे, आपत्कालीन परिस्थितीत ज्वलन प्रतिरोधक साधनं (फायर किट) आहेत का ? तसेच शाळेचे बिल्डिंग फिटनेस कसे आहे ? या बाबींची इत्यंभूत चौकशी करण्यात यावी.



सद्यपरिस्थितीत स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांसाठी ट्युशन क्लासेसची सुद्धा तितकीच आवश्यकता आहे. मात्र क्लासेस मध्ये वरील सर्व सुविधा उपलब्ध आहेत का ? त्याच बरोबर परळी शहरात एकूण किती (ट्युशन) क्लासेस चालतात, कुठे कुठे चालतात, त्यासर्व संचालकांची नावं आणि त्यांचा पत्ता याची सर्व आकडेवारी निश्चित करण्यात यावी. जेणेकरून त्या क्लासेस मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे आरोग्य व सुरक्षेच्या बाबतीत प्रश्न निर्माण होणार नाहीत. सदरील निवेदनाची दखल घेत याप्रसंगी गटशिक्षणाधिकारी श्री एस. एम. कनाके यांनी निवेदनातील सूचना व मागण्यांची त्वरीत पूर्तता करण्याच्या दृष्टीने वरिष्ठांशी बोलुण कार्यवाही केली जाईल असा शब्द दिला. विद्यार्थ्यांचे आरोग्य व सुरक्षे विषयी शिक्षण विभागाने घालून दिलेल्या निर्देशांचे पालन सर्व शाळांद्वारे होते किंवा नाही याबाबत शिक्षण विभागा मार्फत चौकशी करावी. अशी मागणी सेवकराम जाधव, केशवराव मुंडे यांनी परळीचे गटशिक्षणाधिकारी एस. एम. कनाके यांच्याकडे निवेदणाद्वारे केली आहे.

# स्थानिक गुन्हे शाखा एएचटीयु यांचा संयुक्तपणे शिवाजीनगर पोलीस स्टेशन हद्दीत वैश्या व्यवसायावर छापा

दिनांक ०३/०७/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष बीड येथे गुप्त बातमीदार मार्फत बातमी मिळाली की, पोलीस ठाणे शिवाजी नगर हद्दीत भगवान विद्यालयाचे मागील बाजूला, तक्षशिला नगर, धानोरा रोड बीड, येथे दोन महिला बाहेरून महिला बोलावून वेश्या व्यावसाय करीत असल्याची माहिती मिळाल्याने सदरची माहिती वरीष्ठांना दिली. त्यावरून वरीष्ठांनी शिवाजी धोंडीबा बंटेवाड, पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा. यांना सदर ठिकाणी छापा टाकण्याचे लेखी आदेश दिले. त्यावरून शिवाजी धोंडीबा बंटेवाड, पोलीस निरीक्षक, तसेच अ.मा. वा.प्र. कक्ष बीड येथील स्टाफ यांनी डमी ग्राहक व पंचांसह सदर ठिकाणी सापळा रचून डमी ग्राहकास सदर ठिकणी पाठवुन खात्री केली असता तेथे असलेल्या महीला एजंट ने वेश्या गमनासाठी होकार देवून त्यासाठी १५००/- रुपयांची मागणी केली. डमी ग्राहक याने ठरल्याप्रमाणे रक्कम देवून पोलीस पथकास इशारा केला असता पोलीस पथकाने सदर




ठिकाणी छापा मारला. पैसे स्विकारलेल्या महिलेला तिचे नाव गाव विचारले असता तिने तिचे नाव आशा पंडित गायकवाड वय ४५ वर्षे रा. मोतीमहल, सुभाष रोड, बीड ता.जि.बीड ह.मु. तक्षशिला नगर, धानोरा रोड बीड असे सांगितले. सदर महिलेची झडती घेतली असता डमी ग्राहकाने दिलेल्या नमुद वर्णनाच्या ५००/- रूपये दराच्या तिन नोटा मिळून आल्याने पंचांसमक्ष जप्त केल्या. सदर ठिकाणी २ पिडीत महिला मिळून आल्या. पिडीत महिलांना विश्वासात घेवून चौकशी केली असता त्यांनी कळवले की, आशाबाई पंडित गायकवाड़ ही व तिची सहकारी कुशीवर्ता मोहन शिराळे रा. धानोरा, ता. जि.बीड यांनी पिडीत महिलांना बोलावून स्वतःचे आर्थिक फायदयासाठी ग्राहकांकडून पैसे घेवून पिडीत महिलांकडून वेश्याव्यवसाय करून घेत असल्याचे सांगीतले. आरोपी आशाबाई पंडित गायकवाड यांची दोन पंचासमक्ष झडती घेतली तिच्याकडे डमी ग्राहकाने दिलेल्या तिन नोटा मिळून आल्या. तसेच रुमची झडती घेतली असता णड्ढ ऊ कंपनीचे १२ विना वापरलेले निरोध मिळून आले आहे. आरोपी क्र १ आशाबाई पंडित गायकवाड वय ४० वर्षे रा. मोतीमहल, सुभाष रोड बीड, ता.जि.बीड ह.मु. तक्षशिला नगर, धानोरा रोड, बीड, ता. जि.बीड २. कुशीवर्ता मोहन शिराळे वय ४५ वर्षे राधानोरा रोड, ता.जि.बीड असे दोघींनी वर नमूद पिडीत महिलांना स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी तिला बोलावून स्वतः चे ताब्यातील जागेचा वापर करून, त्याच कमाईवर उदरनिर्वाह करून वेश्याव्यवसाय करण्यास लावले व सदर महिलांचे शोषण करण्याचे उद्देशाने बोलावले म्हणून त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे अनौतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५,६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आहे. तसेच दोन पिडीत महिलांची सुटका करण्यात आली आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर उपविभागीय पोलीस अधिकारी कमलेश मीना यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी धोंडीबा बंटेवाड, पोलीस निरीक्षक, पोउपनि मुरकुटे पोह/ १६२६ शिंदे पोशि/ २२१० अशपाक, पोशि/२२१५ परझणे) स्था. गु शाखा बीड, व पोउपनि पल्लवी जाधव, मपोह/९९७ उषा चौरे, मपोह/ ६८ शोभा जाधव, मसफौ/८४२ मिरा रेडेकर, पोह/२१५७ प्रदिप येवले, पोह/२४२ अशोक शिंदे, चालक पोशि/१९८२ योगेश निर्धार सर्व ने.अ.मा.वा.प्र. कक्ष बीड, यांनी केली.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ०५ जुले २०२५
https://lokaarambh.com



## प्रवेशोत्सवादरम्यान विद्यार्थी संख्या वाढली; पुस्तके कमी पडली!



प्रतिनिधी सौरभ आडे वाशिम : तालुक्यातील कोकलगाव जिल्हा परिषद शाळेत प्रवेशोत्सवादरम्यान ६ विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले. त्यामुळे ऐनवेळी ६ विद्यार्थ्यांना पुस्तके वाटप करताना कमी पडली. यावर उपाय म्हणून प्राथमिक शिक्षण विभागाने इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या ६ विद्यार्थ्यांसाठी तातडीने पाठ्यपुस्तकांचे समायोजन करून पुस्तके उपलब्ध करण्याच्या सूचना प्राथमिक शिक्षण विभागाने घेतलेल्या बैठकीत दिल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, वाशिम तालुक्यातील कोकलगाव जिल्हा परिषद शाळेमध्ये इयत्ता पहिलीत १४ विद्यार्थ्यांची नोंद होती. मात्र, त्यानंतर पटसंख्या वाढीच्या दृष्टीने नव्याने ६ विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले. यामुळे इयत्ता पहिलीत १४ विद्यार्थ्यांसाठी पुस्तके पुरविण्यात आली; परंतु ६ नव्या विद्यार्थ्यांना पुस्तके कमी पडली. या बाबीवर विचार करीत प्राथमिक शिक्षण विभागाने तातडीने बैठक घेऊन केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांना या ६ विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तके समायोजन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे लवकरच या विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करून दिली जातील.

## प्रत्येकाने वृक्ष दत्तक घेऊन त्याचे संवर्धन करावे - ओमप्रकाश यादव



परभणी - बदलत्या नैसर्गिक परिस्थितीनुसार पर्यावरणाच्या संवर्धनासाठी प्रत्येकाने वृक्ष दत्तक घेऊन त्याचे संवर्धन करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी ओमप्रकाश यादव यांनी केले. शुक्रवार दि. ०४ जुलै २०२५ रोजी पाथरी तालुक्यातील वडी या ग्रामपंचायती मध्ये माझं गाव माझं योगदान उपक्रमांतर्गत गावकऱ्यांच्या लोकसहभागातून वृक्ष लागवड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गावच्या सरपंच सौ सुशीलाताई खंडागळे, उपसरपंच सिद्धेश्वर शिंदे, शालेय समिती अध्यक्ष कृष्णकुमार शिंदे, माजी सरपंच शिवाजीराव कुटे, माजी उपसरपंच प्रतापराव शिंदे, प्रा. एस एस शिंदे, सोमेश्वर शिंदे, ग्रामविकास अधिकारी, प्रभाकर खेत्री, मुख्याध्यापक संजय चिंचाणे, सर्व ग्रामपंचायत सदस्य, शा.व्य. समिती सदस्य, सर्व शिक्षक, ग्रा.पं.कर्मचारी गोपाळ शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी गावातील प्रमुख ठिकाणी वड, पिंपळ, जांभूळ, पेरू, आंबा, अशा विविध फळझाडांची लागवड करण्यात आली. ओमप्रकाश यादव यांनी गावातील नागरिकांना फळबाग, आधुनिक शेती, तसेच शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा आणि बांधावर मोकळ्या जागेत वृक्षरोपन करुन गावकऱ्यांना वृक्ष लागवडीचा संकल्प देऊन दत्तक घेत असलेल्या वृक्षांचे संगोपन करण्या बाबत आवाहन केले. यावेळी त्यांनी पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडी या ठिकाणी भेट देऊन शाळेच्या परिसरात वृक्षारोपण केले. शाळेत काही वर्गांना भेटी देऊन अधिकारी होण्यासाठी विध्यार्थ्यांशी दिलखुलास सवांद साधला. विध्यार्थी गुणवत्ता आणि शिस्त तसेच भौतिक सुविधा, आणि शालेय परिसर पाहून समाधान व्यक्त केले.

# शक्तिपीठ महामार्ग मोजणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना पिंगळी व शेंद्रा येथील शेतकऱ्यांनी मोजणी न करताच परत पाठवले

परभणी – शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनासाठी शेतजमीन मोजण्याकरिता आज दि.४ जुलै रोजी परभणी तालुक्यातील शेंद्रा व पिंगळी येथील शेतकऱ्यांनी मोजणी न करू देताच परत पाठवले. यावेळी शेतकऱ्यांनी प्रचंड घोषणाबाजी करत जमीन मोजणीसाठी आलेले अधिकाऱ्यांना आम्ही आमच्या सुपीक जमिनी कुठल्याही परिस्थितीत शक्तिपीठ महामार्गासाठी देणार नाहीत असा लेखी पंचनामा करून शासनाकडे पाठविण्यासाठी भाग पाडले. परभणी जिल्ह्यातील पूर्णा परभणी व सोनपेठ तालुक्यातून एकूण ७१ किलोमीटरचा शक्तिपीठ महामार्ग जाणार आहे. या महामार्गामध्ये शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणावर सुपीक जमिनी जाणार असून




भूसंपादनासाठी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर विरोध आहे या आधी पूर्णा तालुक्यातील सुरवाडी आणि सोनपेठ तालुक्यातील कानेगाव येथील शेतकऱ्यांनी जमीन मोजनीला विरोध करत मोजणी करण्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यांना परत पाठवले होते. दिनांक ०१ जुलै २०२५ रोजी महाराष्ट्रात बारा ठिकाणी तर चार ठिकाणी शेतकऱ्यांनी रास्ता रोको करून शक्तिपीठ महामार्गाला मोठ्या प्रमाणावर विरोध केला आहे. शेतकऱ्यांच्या या आंदोलनाला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष किशोर ढगे, प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाप्रमुख शिवलिंग बोधने, कॉम्रेड माधुरीताई क्षीरसागर, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अमोल जाधव यांच्यासह अनेक शेतकरी संघटनांनी पाठिंबा देत सक्रिय सहभाग नोंदविला होता तसेच या रास्ता रोको आंदोलनामध्ये वरील सर्व पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविला होता.

## टप्पावाढीसाठी ८ व ९ जुलै रोजी शिक्षक समन्वय संघाचे शाळा बंद आंदोलन!

# आंदोलनास मराठवाडा शिक्षक संघाचा पाठींबा!

बीड (दिनांक ४ जुलै): १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासनादेशानुसार विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळा वर्ग आणि तुकड्यांना टप्पावाढ मिळावी म्हणून ५ जुन २०२५ पासून शिक्षक समन्वय संघाचे आझाद मैदानावर आंदोलन सुरू आहे. सरकार त्याची दखल घेत नसल्याने शिक्षक समन्वय संघाने ८व व ९ जुलै रोजी शाळा बंद आंदोलनाची हाक दिली आहे. मराठवाडा शिक्षक संघाने या आंदोलनास पाठींबा दिला असून शिक्षकांच्या सहनशीलतेचा अंत न पहाता टप्पावाढ देण्यात यावी अशी मागणी म राठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केली आहे. मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, एकीकडे शिक्षकांना देशाचा शिल्पकार म्हणायचे, त्यांच्या नावाने शिक्षक दिन साजरा करायचा. आदर्श शिक्षक पुरस्कार देवून त्यांचा सन्मान करायचा आणि दुसरीकडे त्याला उपाशी मारायचे. हेच का तुमचे शिक्षक प्रेम? राज्यातील कायम शब्द काढलेल्या सुम





रे चार हजार विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळा वर्ग आणि तुकड्यांवर हजारो शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी गेले पाव शतक उपाशीपोटी काम करत आहे. तुम्हीच केलेले कायदे तुम्ही पाळायला तयार नाहीत. वेतन मागितले तर लाठ्या मारता वर आम च्यावरच हाफ मर्डर गुन्हे दाखल करता! तुम्हाला याची थोडी तरी शरम वाटली पाहिजे. टप्पा अनुदानासाठी ५ जून पासून राज्यातील शिक्षक आझाद मैदानावर आंदोलन करत आहेत. यापूर्वीही याच मागणीसाठी शेकडो आंदोलने झाली आहेत.परंतु गेंड्याची कातडी पांघरलेल्या सरकारने फक्त जिम्मेदारी ढकलण्याचे काम केले आहे. यामुळे राज्यातील शिक्षकांमधे तीव्र असंतोष, संताप आणि चीड निर्माण झाली आहे. याचा परिपाक म्हणून शिक्षक समन्वय संघाने दोन दिवशीय शाळा बंद आंदोलनाची हाक दिली आहे. मराठवाडा शिक्षक संघाने या आंदोलनास पाठींबा दिला आहे. टप्पावाढ न देण्यात आल्यास बेमुदत शाळा बंद आंदोलनाचा ईशारा मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, कोषाध्यक्ष औताडे ए. बी., माजी जिल्हाध्यक्ष डी.जी.तांदळे, जिल्हाध्यक्ष कालिदास धपाटे, जिल्हा सचिव गणेश आजबे , केंद्र कार्यकारिणी सदस्य बंडू आघाव, अशोक मस्कले, नामदेव काळे, सुभाष शेवाळे, विजय गणगे, परवेज देशमुख, व्यंकटराव धायगुडे, हनुमंत घाडगे, गोवर्धन सानप, मनोज सातपुते, तावरे डी. एम, दिनकर शिंदे, युवराज मुरूमकर, विनोद सवासे, अनुप कुसुमकर, श्रीधर गुट्टे, सुमंत गायकवाड, विष्णू वळेकर, प्रदीप चव्हाण, हेमंत धानोरकर, शेख आय. जे, एम.डी. डोळे, अशोक अशोक गाडेकर, शिवाजी ढोबळे, जीवनराव थोरात, बाळासाहेब टिंगरे, दादासाहेब घुमरे, बाळासाहेब काळुशे, शामसुंदर साळुंके, सुनिल जाधव, श्रीनिवास काकडे, हनुमंत गवारे, तुळशीदास सोळंके, जगदिश्चंद्र प्रेमचंद तोष्णीवाल, नदीम युसूफ, पुरुषोत्तम येडे पाटील, संजय गोरे, अलिशान काझी, सुनिल नागरगोजे, बी. टी. खाडे यांनी दिला आहे यांनी दिला आहे.

# भाऊसाहेब भवर यांच्या वाढदिवसानिमित्त अंमळनेर गटात विविध कार्यक्रमाची रेलचेल!

## महादेवाचा अभिषेक, सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक साहित्य वाटप, वृक्षारोपण!

कुसळंब प्रतिनिधी भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा अमळनेर जिल्हा परिषद गटातील सामाजिक कार्यकर्ते आणि अन्नदानाचा अग्निकुंड अविरत सुरू ठेवणारे आमदार सुरेश आण्णा धस यांचा सच्चा शिलेदार म्हणून ज्यांची ओळख आहे असे भाऊसाहेब अण्णा भवर यांच्या वाढदिवसानिमि त्त अमळनेर जिल्हा परिषद गटांमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन केले असून प्रमुख उपस्थिती सुरेश आण्णा धस यांची असणार आहे तर प्रमुख पाहुणे माजी आमदार साहेबराव नाना दरेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप, जिल्हा परिषद सदस्य देविदास आबा धस, डीवायएसपी संतोष खाडे, एपीआय भार्गव सपकाळ साहेब यांची विशेष उपस्थिती असणार आहे.भाऊसाहेब अण्णा भवर यांच्या वाढदिवसानिमित्त अंमळनेर जिल्हा परिषद गटामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रम



ासाठी यामध्ये महादेवाला अभिषेक करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात येणार असून सांस्कृतिक कार्यक्रम शैक्षणिक साहित्य वाटप वृक्षारोपण तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार असे विविध उपक्रम अमळनेर जिल्हा परिषद गटामध्ये घेण्यात येणार आहेत. या कार्यक्रम ासाठी पाटोदा तालुक्यातील सर्व सामाजिक धार्मिक राजकीय शैक्षणिक सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

### कार्यक्रमाची रूपरेषा!

रविवार दि.६/७/२५ रोजी सकाळी ६ वाजता महादेवाला अभिषेक करून कार्यक्रमाला सुरुवात. दुपारी ३ वाजता मुगगाव येथे अभिष्टचिंतन सोहळा होणार आहे.
दुपारी ४ वाजता गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ होईल. संध्याकाळी ७ वाजता म ुगगाव येथे स्नेह भोजनाचा कार्यक्रम होईल. सोमवार दिनांक ७/७/२५ रोजी सकाळी ११ वाजता शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप होईल. संध्याकाळी ६ वाजता अंमळनेर येथे सर्वांच्या मनातील चेहरा राधा पाटील यांचा सांस्कृतिक कार्यक्रम होईल.

### यांच्या सहकार्याने होणार विविध उपक्रम

अमळनेर जिल्हा परिषद गटातील सर्व सरपंच, उपसरपंच, सदस्य, आजी माजी पदाधिकारी, चेअरमन, सदस्य, हितचिंतक, मित्रपरिवार यांच्या विशेष सहकार्यातून हा भव्य दिव्य वाढदिवस मोठ्या उत्साहामध्ये साजरा होत आहे.मान्यवर उपस्थित राहणार आहे..

### हजारो प्रमुख अतिथींची उपस्थिती

भाऊसाहेब अण्णा भवर यांच्या वाढदिवसानिमित्त अंमळनेर सर्कल सह पाटोदा तालुक्यातील हजारो प्रमुख अतिथींची उपस्थिती असणार आहे यामध्ये राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, पत्रकारिता आधी सह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहे..

# उमाकिरण शिक्षण संकुलातील नराधम शिक्षकाचा काळा चेहरा उघड

## पालकांना हादरवणारी धक्कादायक माहिती पोलिसांचा फास आणखी आवळला..!

बीड: शिक्षणाच्या नावाखाली अल्पवयीन मुलींचे आयुष्य उद्धवस्त करणाऱ्या उमाकिरण शिक्षण संकुलातील लंपट शिक्षक विजय पवार आणि त्याचा साथीदार प्रशांत खाटोकर यांच्या गोरखधंद्याचा आता पोलिसांनी पत्ता लावला आहे. विजय पवारने शासनाच्या डोळ्यात धूळफेक करत खाटोकरच्या नावावर बनावट मालकी दाखवून क्लासेस सुरू केले, शिक्षक-विद्यार्थ्यांच्या नोंदी ठेवल्या नाहीत, आणि टॅक्स वाचवण्यासाठी गैरप्रकार केले, असे गंभीर तपशील समोर आले आहेत.पोलीस अधिकाऱ्यांनी या दोघांचा पिंगा वाढवला असून आतापर्यंत ३० साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात आले आहेत. खाटोकरची दुचाकी, तसेच आरोपींचे मोबाईल, लॅपटॉप, टॅब सगळं जप्त केलं गेलंय. संस्थेतील सीसीटीव्हीमध्ये केवळ २० दिवसांचा डेटा सापडल्याने डीव्हीआर फॉरेन्सिक लॅबला पाठवण्यात आलं आहे.
या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून घटनेचे रिक्रिएशन (घटनेची जागेवर पुनर्रचना) होणार असल्याचं समजतंय, जेणेकरून या नराधमांनी काय आणि



कसं केलं याचा पर्दाफाश करता येईल.
एका अल्पवयीन मुलीच्या तक्रारीने या विजय पवारचा मुखवटा फाटला आणि पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाल्यावर उभ्या महाराष्ट्रात संताप उसळला. विधानसभेतही या विषयाची दखल घेण्यात आली. विजय पवारसारख्या विकृत शिक्षकाने पैसे, राजकीय वरदहस्त आणि दबावतंत्र वापरून आपला काळा व्यवसाय सुरू ठेवला होता, हे आता तपासात स्पष्ट होतंय..
******

# सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी पोलिसांवर गुन्हे दाखल करण्याचे हायकोर्टाचे आदेश


परभणी। प्रतिनिधी परभणीमधील सोमनाथ सूर्यवंशीच्या मृत्यू संदर्भात मोठी माहिती समोर आली आहे. सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू हा पोलिसांच्या मारहाणीतच झाला असून या मृत्यूला पोलीसच जबाबदार असल्याचा आरोप त्याच्या कुटुंबियांकडून सुरूवातीपासूनच केला जातोय. परभणीच्या नवामोंढा पोलीस ठाण्यात सोमनाथ सूर्यवंशीला मारहाण करण्यात आल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. सोमनाथ सूर्यवंशीचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला होता. हा ४५१ पानांचा गोपनीय अहवाल राज्य मानवाधिकार



आयोगासमोर सादर केला. आता थेट संबंधित पोलिसांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले. सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणात प्रकाश आंबेडकरांनी न्यायालयात बाजू मांडली होती. आता हायकोर्टाने संबंधित पोलिसांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिली आहेत. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आईने ही याचिका दाखल केली होती. याबाबत प्रकाश आंबेडकर हे सायंकाळी पाच वाजता पत्रकार परिषद घेणार आहेत. हायकोर्टाने हे आदेश दिले आहेत. परभणीत संविधान अवमाननेच्या घटनेनंतर आंदोलन झाले होते. या आंदोलनात सोमनाथ सूर्यवंशी हे देखील सहभागी झाले. यादरम्यान या आंदोलनाने उग्र रूप धारण केले. या आंदोलनावेळी ताब्यात घेतलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्या पोलिसांवर कारवाई करावी, यासाठी आंबेडकरी चळवळीतील अनुयायांनी जानेवारी महिन्यात परभणी ते मुंबई असा लॉन्ग मार्च काढला होता. राहुल गांधी यांनीही सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. न्यायालयीन कोठडीमध्ये असताना सोमनाथ सूर्यवंशींना हृदयविकाराचा झटका आला. दरम्यान त्यांना रुग्णालयामध्ये नेत असतानाच त्यांचा मृत्यू झाल्याचा दावा पोलिसांनी केला. न्यायालयीन कोठडीत पोलिसांकडू न सोमनाथ सूर्यवंशीला बेदम मारहाण झाली आणि त्यामध्येच त्याचा मृत्यू झाला, असा आरोप कुटुंबियांकडून करण्यात आला. एका माथेफिरूने १० डिसेंबरला संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना केली होती आणि त्याविरोधात ११ तारखेला परभणीत आंदोलन करण्यात आलं होते. या प्रकरणात तीन पोलिसांचे यापूर्वीच निलंबन करण्यात आले. आता हायकोर्टाने हे आदेश देत गुन्हा दाखल करा, असे थेट आदेशच दिले आहेत.

# घोटाळेखोर जिजाऊ मल्टीस्टेटच्या घोटाळ्याचा दुसरा वर्धापन दिन :- शेख युनूस

बीड (प्रतिनिधी) बीड जिल्ह्यातील २०० कोटी पेक्षा जास्त ठेवी असणाऱ्या जिजाऊ मल्टीस्टेटच्या घोटाळ्याला आज दुसरे वर्ष पूर्ण होत आहे. त्याचबरोबर ज्ञानराधा मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट, श्री साई राम अर्बन या सर्व बँकांच्या घोटाळ्याची दोन वर्षपेक्षा जास्त काळ झालेला आहे. तरी अद्याप संचालकाच्या मालमत्ता जप्त करण्याचे धाडस अजून सुद्धा गुन्हे शाखेकडून झालेले नाही. आता ठेवीदारांची पोलिसांकडून मदत होत नसल्याचे दिसून येत आहे. जेव्हा बीड व जालना जिल्ह्यातील आमदारांनी प्रश्न उपस्थित



केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनी ज्ञानराधा मल्टीस्टेट याप्रकरणी ६०० कोटीच्या मालमत्तेचा लिलाव करून ठेवीदाराचे पैसे देणार असल्याचे स्पष्ट केले होते. परंतु दोन वर्ष होऊन गेले तरी ठेवीदारांचे एक रुपया सुद्धा मिळालेला नाही. अजून किती काळ लागेल हे पोलीस प्रशासनाकडून माहिती मिळत नाही. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब ,पोलीस अधीक्षक नवनीत कावत साहेब यांनी आता लक्ष घालावे. हे ठेवीदाराकडून अपेक्षा आहे.

आतापर्यंत बरेच ठेवीदारांचे घरी उध्वस्त झाली. कुणी आत्महत्या, केली कोणाच्या मुलीचे लग्न मोडले ,अशा अवस्था असताना सुद्धा जाणीवपूर्वक संचालकाची मालमत्ता जप्त करण्यात हालतर्जीपणा दिसून येत आहे.सचिन भैय्या उबाळे व ठेवीदाराच्या सतत पाठपुराव्याने एम पी आय डी प्रस्ताव मंजूर होऊन मालमत्ता जप्तीची कारवाई सुरू लवकरात लवकर करावी व गोरगरीब जनतेचे पैसे देण्याचे आदेश शासनाकडून मिळालेले आहे. तरी याबाबत अजून तरी काही ठोस पाऊल उचलण्यात आलेले नाही.

तरी सर्व ठेवीदारीच्या वतीने मुख्यमंत्री तसेच पालकमंत्री व बीडचे खासदार व सर्व आमदार यांना विनंती आहे की त्यांनी पुढे येऊन गोरगरीब, कष्टकरी यांचे पैसे मिळवून देण्यात मदत करावी. हीच अपेक्षा ठेवीदार आपल्याकडून करत आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस असंघटित कामगार विभागाच्या वतीने रुग्णांना फळवाटप



बीड लोक इच्छा न्युज: राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी असंघटित कामगार विभागाचे प्रदेशाध्यक्ष मा. मनोजजी व्यवहारे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथे रुग्णांना फळवाटप करण्यात आले. या उपक्रमात अनेक रुग्णांना भेटवस्तू व फळे देऊन आनंद व्यक्त करण्यात आला यावेळी जिल्हाध्यक्ष अलीम पटेल, जिल्हा संघटक एजाज शेख, गेवराई तालुका अध्यक्ष रहीम शेख तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात समाजसेवेचा संदेश देत, गरजू रुग्णांच्या मदतीसाठी पुढे येण्याचे आवाहन करण्यात आले.



बीड शहरातील पूरग्रस्त कॉलनी येथे आशेचे द्वार प्रतिष्ठान संस्थेमार्फत ४ जुलै २०२५ रोजी गरजू लोकांसाठी छत्री वाटप करण्यात आली. या कार्याचा लाभ एकूण ३६ लोकांना झाला. या कार्यक्रमासाठी आशेचे द्वार प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष श्री जोसेफ सर, खजिनदार श्री प्रशांत खवडिया सर, सचिव सचिन जाधव सर, प्रोजेक्ट डायरेक्टर श्री प्रदीप लोंढे सर,

# किनवट गोकुंदा शहरातील भारतीय स्टेट बँकेचे एटीएम अनेक दिवसापासून बंद अवस्थेत

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट : किनवट व गोकुंदा शहरातील भारतीय स्टेट बँकेचे एटीएम हे अनेक दिवसापासून बंद अवस्थेत असून ग्राहकांची प्रचंड गैरसोय होत आहे.किनवटसह गोकुंदा येथे ग्राहकांची मोठी गर्दी याठिकाणी असते ह्या परिसरात शाळा कॉलेज कोचिंग क्लासेस पोलीस प्रशिक्षण अकॅडमी उपजिल्हा रुग्णालय आहे.तर किनवट येथे रविवारचा आठवडी बाजारासाठी ग्रामीण







भागातील जनतेची वर्दळ या ठिकाणी असते. ग्राहकांना पैसे काढण्यासाठी हे मुख्य बाजारपेठेतील एटीएम अनेक दिवसापासून बंद अवस्थेत दिसून येत आहे. यामुळे नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. किनवट व गोकुंदा या मुख्य ठिकाणी असलेल्या भारतीय स्टेट बँकेचे एटीएम अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत असून तेथे ग्राहकांना कुठलीही सुविधा उपलब्ध नसते.अस्वच्छतेचे परिणाम ग्राहकांना पहावयास मिळतात त्या ठिकाणी सुरक्षारक्षक किंवा एटीएम मध्ये फॅन किंवा एसी चालू अवस्थेत कधीही दिसून येत नाही.सुरक्षेच्या कारणाने प्रत्येक एटीएम मध्ये सुरक्षा रक्षक असणे अत्यंत आवश्यक असून त्या ठिकाणी ग्रामीण भागातील ग्राहक मोठ्या प्रमाणावर येतात एटीएम मध्ये पैसे उचलायला आल्यानंतर खूप अडचणींना तोंड द्यावं लागत असल्याच्या ग्राहकांच्या तक्रारी आहेत.

# तहसीलदार संदिप खोमने यांना जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांनी बजावली कारणे दाखवा नोटीस!

## तीन दिवसात खुलासा सादर न केल्यास शिस्तभंगाची कारवाई होणार

गेवराई प्रतिनिधी: - गेवराईचे तहसीलदार संदीप खोमणे यांच्यावर अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात अपयश आल्याने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने खोमणे यांना बुधवार दि.१ जुलै रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली असून, तीन दिवसांत लेखी खुलासा सादर करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे प्रशासकीय वतुर्ळात खळबळ उडाली आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहितेनुसार अवैध उत्खनन आणि वाहतुकीवर कारवाईचे निर्देश असताना, गेवराई तालुक्यातील गोदावरी नदी पात्रात वाळू माफियांनी कथितपणे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अवैध उत्खनन केल्याच्या बातम्या विविध वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाल्या. यामुळे शासनाची प्रतिमा मलिन झाल्याचा ठपका ठेवत, जिल्हाधिकाऱ्यांनी तहसीलदारांवर निष्काळजीपणाचा आरोप केला आहे. शासनाच्या १४ जून २०१७ आणि ८ एप्रिल २०२५ च्या परिपत्रकांनुसार, वाळू संनियंत्रण समित्यांनी काटेकोर कारवाई करणे अपेक्षित होते, परंतु तहसीलदारांनी याकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले.जिल्हाधिकाऱ्यांनी नोटीशीत म्हटले आहे की, तहसीलदारांचे वर्तन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ च्या कलम ३ अंतर्गत गैरवर्तन ठरते. याप्रकरणी खुलासा न मिळाल्यास शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित आहे. यामुळे गेवराई तालुक्यातील वाळू माफियांच्या मनमानी कारवायांना आळा बसण्याची शक्यता आहे. स्थानिक नागरिकांनी या कारवाईचे स्वागत केले असून, प्रशासनाने यापुढे कठोर पावले उचलावीत, अशी मागणी केली आहे.



This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com